**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक १२/२०२०** **दिनांक ११/०२/२०२०** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. प्रशांत बोडके,** | **डॉ. विजय मोरे,** | **डॉ. शितल यादव,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी |
| कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग | कृषिविदया विभाग |
| ९४२०४१३२५५ | ९४२२३७४००१ | ८३७९९०११६० |


| **मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०५/०२/२०२० ते ११/०२/२०२०)** | | | | | | | **हवामानाचे घटक** | **हवामान पूर्वानुमान (दिनांक १२/०२/२०१९ सकाळी ८:३० पासून १६/०२/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत)** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **०५/०२** | **०६/०२** | **०७/०२** | **०८/०२** | **०९/०२** | **१०/०२** | **११/०२** | | **१२/०२** | **१३/०२** | **१४/०२** | **१५/०२** | **१६/०२** |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | **पाऊस (मिमी)** | ० | ० | ० | ० | ० |
| ३०.२ | ३०.६ | २९.८ | २८.० | ३१.६ | ३१.८ | ३३.८ | **कमाल तापमान (अं.से)** | ३२ | ३३ | ३५ | ३५ | ३५ |
| १६.८ | १४.८ | १३.४ | १५.४ | १७.२ | २०.० | १९.५ | **किमान तापमान (अं.से)** | २१ | २१ | २२ | २१ | २१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ४ | ३ | २ | ३ | १ |
| ५१ | ८६ | ७० | ८६ | ६१ | ५९ | ७२ | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ५६ | ५१ | ४३ | ३८ | ३२ |
| ३६ | २६ | ३३ | ३३ | ३४ | ५१ | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ३३ | २८ | २१ | १९ | १८ |
| ५.१ | ४.० | ४.२ | ४.० | ५.९ | ५.३ | ४.६ | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | ८ | ७ | ८ | १० | १० |
| नै.प. | इ.उ. | द. | आ. | आ.द. | आ.द. | शांत | **वाऱ्याची दिशा** | पू. | ई.पू. | ई.पू. | ई. | ई. |

| **पाऊस (मिमी) मागील आठवडयातील** | **पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत** | **पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा** |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ४२३३.४ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १२ ते १६ फेब्रुवारी २०२० दरम्यान कमाल व किमान तापमानात वाढ संभवत असून आकाश अंशतः ढगाळ राहील.**

| **पिक** | **अवस्था** | **कृषि सल्ला** |
|---|---|---|
| **उन्हाळी भात** | **रोप अवस्था** | • भात पुर्नलागवडीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत शेतात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें. मी. ठेवावी |
| **वाल** | **दाणे अवस्था** | • वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किड कोवळ्या शेंड्यावर पानाच्या खालच्या भागातील रस शोषून घेतात त्यामुळे झाडाची वाढ खुंटते तसेच किडीने बाहेर टाकलेल्या मधासारख्या चिकट द्रावणामुळे पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १२ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **आंबा** | **मोहोर अवस्था** | • मोहोर अवस्थेत असलेल्या आंबा पिकावर कीड व रोगाच्या नियंत्रणासाठी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापुर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) नियंत्रणासाठी इमिडाक्लोर्प्रीड १७.८ टक्के प्रवाही ३ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे.<br><u>टिप:</u> फवारणी करताना मोहोर नुकताच फुलत असल्यास आणि फळधारणा झालेली नसल्यास शक्यतो फवारणी फळधारणा होईपर्यंत टाळावी किंवा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात असल्यास आणि फवारणी करणे गरजेचे असल्यास बागेतील परागीकरण करणाऱ्या कीटकांचा परागीकरणाचा कालावधी (सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत) वगळून फवारणी करावी.<br>• वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या आंबा कलमांना पहिली तीन वर्षे पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. पहिल्या वर्षी आठवडयातून एकदा तर दुसऱ्या वर्षी पंधरा दिवसातून एकदा व तिसऱ्या वर्षी महिन्यातून एकदा प्रत्येक कलमांना ३० लिटर पाणी द्यावे. |
| **काजू** | **फळधारणा अवस्था** | • फळधारणा झालेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने किडींच्या नियंत्रणासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन प्रवाही ६ मि.ली. प्रति १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. (सदर कीटकनाशकास लेबल क्लेम नाहीत).<br>• वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या काजू कलमांना पंधरा दिवसाच्या अंतराने १५ लिटर पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच जोडाच्या खाली बुंध्यावर येणारी फूट वेळोवेळी काढून टाकावी. |
| **नारळ** | **-** | • नारळावर रुगोज चक्राकार पांढरी माशीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून या किडीची पिल्ले आणि प्रौढ पानाच्या खालील बाजूस रस शोषतात. तसेच माशी गोड चिकट स्त्राव सोडत असल्याने पानांवर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. किडीच्या नियंत्रणासाठी ३० मि.ली. कडूलिंब तेल (०.५ टक्के प्रवाही) प्रती १० लिटर पाणी या प्रमाणे १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. तसेच पानावरील काळी बुरशीच्या व्यवस्थापनासाठी १ टक्के स्टार्च सोल्युशन फवारावे.<br>• पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा तिसरा हप्ता द्यावा. खते नारळाभोवती १.५ ते १.८ मीटर अंतरावर मातीत मिसळून दयावीत व खते दिल्यानंतर माडास पाणी दयावे.<br>• वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनात वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या बागेस ६ ते ७ दिवसांच्या आणि पूर्ण |

| | | |
|---|---|---|
| | | वाढलेल्या माडास जमिनीच्या मगदुराप्रमाणे ५ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भेंडी** | **वाढीची अवस्था** | • भेंडी पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असून किड पिकातील अन्नरस शोषून पिकाच्या विविध भागावर मधासारखा चिकट स्त्राव टाकत असल्याने पानावर काळ्या बुरशीची वाढ दिसून येते. मावा किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किडग्रस्त पाने/ शेंडे नष्ट करावेत तसेच पिकामध्ये पिवळे चिकट कागद सापळे लावावेत. |
| **वांगी** | **फळधारणा अवस्था** | • वांगी पिकावर शेंडा व फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी किडग्रस्त शेंडे व फळे जमा करून नष्ट करावीत व फेनव्हलरेट १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन २.८ टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसारतयार करून प्रसारित करण्यात आली.<br>अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा** | | |